N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण **P.S.**(ठाणे): बार्शी शहर

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0509 **Year** (वर्ष): 2024

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):18/06/2024 18:37

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7A

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 18/06/2024

Time Period (कालावधी): **Date To** (दिनाक पर्यंत): 18/06/2024

Time From (वेळेपासून): 11:30 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:39 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 18/06/2024 **Time** (वेळ): 18:25 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 030

Date & Time (दिनांक आणि वेळ): 18/06/2024 18:25 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 2 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): बार्शी तहसिल कार्यालय बार्शी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then-**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. नितीन चंद्रकांत शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)**

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address (पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	ढोराळे, ता बार्शी, जि सोलापू, बार्शी शहर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	ढोराळे, ता बार्शी, जि सोलापू, बार्शी शहर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	श्रीमती वर्षा भगवान काळे			1. बार्शी तहसिल कार्यालय बार्शी , बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत):
फिर्यादी जबाब -दिनांक 18.06.2024

मी श्री. नितीन चंद्रकांत शिंदे, वय 30 वर्षे, धंदा वकिली, रा. मु.पो. ढोराळे, ता. बार्शी, जि. सोलापूर, मो.नं. 9370486921 समक्ष फिर्यादी जबाब देतो की,

मी वरील ठिकाणी राहण्यास असुन, माझे एलएलबी पर्यत शिक्षण झालेले असून, सध्या मी खाजगी स्वरुपात वकिलीचे प्रॅक्टीस करीत आहे. माझ्या नावाने पिवळे रेशनकार्ड नं. - 940868 असून, त्याचा 12 अंकी नं. 272031326069 असा आहे. परंतू सदर रेशनकार्डवर धान्य मिळत नसल्यामुळे मी शुक्रवार दि. 14.06.2024 रोजी बार्शी तहसिलदार येथील पुरवठा शाखा येथील डाटा इंन्ट्री ऑपरेटर म्हणून काम करणा-या श्रीमती वर्षा काळे यांना भेटलो असता, त्यांनी सांगीतल्याप्रमाणे माझ्याकडे सर्व कागदपत्रे असल्याने मी लगेच अर्ज करुन सोबत माझ्या कुटुंबाचे सदस्यांचे आधारकार्ड, रेशनकार्ड झेरॉक्स असे जोडून, डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांना मी अर्ज दिला असता, त्यांनी माझ्याकडे 1500/- रुपयाची मागणी केली, त्यावेळी मी त्यांना कशाचे पैसे असे विचारले असता, पैसे दिल्या शिवाय तुमचे काम होणार नाही असे म्हणून माझा अर्ज त्यांनी घेतला नाही. व त्यांनी पैसे व अर्ज घेवून मला मंगळवारी दि. 18.06.2024 रोजी बोलावले.

आज दि. 18.06.2024 रोजी मी माझ्या कडे होत असलेल्या लाच मागणीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील पो.उप अधीक्षक श्री. गणेश कं‍ुभार यांना फोनव्दारे माहिती दिली. व मी सांगीतल्याप्रमाणे अंदाजे 11.30 वा. चे दरम्यान ते दोन शासकीय पंच व सापळा पथकासह बार्शी-सोलापूर रोडवरील रेल्वे ऑवर ब्रिजचे पाहिले मी थांबलेल्या ठिकाणी आले. सदर ठिकाणी आल्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांनी पंच श्री. सुरेश राम राठोड, विस्तार अधिकारी, कृषी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर व श्रीमती सुमित्रा दत्तात्रय गोरे, कनिष्ठ लिपीक, दुय्यम निंबधक, श्रेणी 01, कार्यालय, वैराग अशी पंचांची ओळख करुन दिली. त्यांनतर पोउपअधी श्री. कुंभार याचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे वरील प्रमाणे नाव गाव त्यांना सांगितले. पोउपअधी श्री. कुंभार यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे असलेल्या डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांचेविरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. पोउपअधी श्री. कुंभार याचे सांगण्यावरुन मी माझी तक्रार लेखी स्वरुपात लिहुन दिली. त्यावर मी, पोउपअधी श्री. कुंभार व दोन्ही पंच यांनी वाचुन सहया केल्या.
त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणे असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी आम्हास व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांनी मला व माझ्या सोबत पंच नं 1 श्री. राठोड यांना सुचना दिल्या की, आम्ही बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे जावून डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांची भेट घेवुन तेथे त्यांना अर्ज देवून रेशन कार्डवर धान्य मिळण्यासंदर्भात चर्चा करावी. डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांनी लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 श्री. राठोड यांना दिल्या.

त्यानंतर मला व पंच नं.1 श्री. राठोड यांना बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे पाठविणे अगोदर पोउपअधी श्री. कुंभार यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकवून, आम्हास डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांची भेट घेवून पडताळणी करण्यास जाण्यास सांगितले. त्यावरुन मी, पंच नं. 1 श्री. राठोड असे माझे मोटारसायकलने बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे जावुन डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांची भेट घेतली असता, त्यांनी माझ्याकडून अर्ज स्विकारुन माझ्या कामाविषयी चर्चा करुन "तुम्हाला सांगीतल्यालं ती" असे म्हणून त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर खासून इशा-यांने माझ्याकडे पैशाची मागणी

केली. त्यावेळी मी किती असे विचारले असता, त्यांनी 1500/- रुपये लाचेची मागणी केली. त्यामध्ये मी तडजोड केली असता त्यांनी पुन्हा 1500/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी एटीएम मधुन काढुन आणतो असे बोलुन मी व पंच श्री. राठोड असे पोउपअधी. श्री. कुंभार व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेथे पोउपअधी. श्री. कुंभार यांनी माझ्या गळ्यातील रेकार्डर काढून पंच नं. 1 श्री. राठोड व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार व पंचांनी रेकॉर्डरमध्ये माझ्यात आणि डाटा इन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांच्यात झालेले संभाषण त्यांच्याकडील लॅपटॉपला व्हाईस रेकॉर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये डाटा इन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांनी माझ्याकडे 1500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांच्या सुचनेवरुन मी डाटा इन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 1500/- रूपये हजर केले. त्यात 500/- रुपये दराच्या 03 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोउपअधी श्री. कुंभार यांचे सुचनेवरुन पो.शि. चालक ब.नं. 1608 सुरवसे यांनी एका को-यां कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोउपअधी श्री. कुंभार व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहलेल्या कागदावर सह्या केल्या. सदर नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही शासकीय वाहन मारुती ईटीकामध्ये करण्यात आली. सदर अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा माझ्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आल्या.

त्यानंतर यातील डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांच्यावर बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे परिसरात लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे अनुषगाने पोउपअधी श्री. कुंभार यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून मी व पंच नं 1 श्री. राठोड असे माझ्या मोटारसायकलवरुन व पोउपअधी. श्री. कुंभार व पंच न 02, सापळा पथक असे शासकीय वाहनाने असे आमचे पाठीमागे येवुन बार्शी तहसिलदार कार्यालय येथे सापळा लावुन थांबले व मी व पंच क्र 01 असे बार्शी तहसिल कार्यालय येथील पुरवठा शाखा येथे जावून डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांची भेट घेतली असता, डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांनी हाताचे इशा-याने लाचे रक्कमेची मागणी केली असता, मी तुम्ही किती सांगीतले होते, तेवढे आणलेत, मोजून घ्या असे म्हणून मी माझ्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांचे समोर धरली असता, त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन, मोजून त्यांचे टेबलच्या उजव्या बाजूच्या डॉवरमध्ये ठेवली. त्यांनतर मी लाच रक्कम स्विकारलेचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोउपअधी श्री. कुंभार , पंच नं. 02 श्रीमती गोरे व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन महिला पंच नं. 02 श्रीमती गोरे यांचे मदतीने डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांना पकडले

सदर ठिकाणी पोउपअधी. श्री कुंभार यांनी डाटा इंन्ट्री ऑपरेटर श्रीमती वर्षा काळे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्रीमती वर्षा भगवान काळे, वय 30 वर्षे, डाटा इंन्ट्री ऑपरेटर (खाजगी स्वरुपात) पुरवठा शाखा, बार्शी तहसिल कार्यालय, मूळ रा. कादंलगांव रोड, सायली हॉटेल शेजारी, बार्शी, सोलापुर असे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह, बार्शी, सोलापुर येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दिनांक 18.06.2024 रोजी 11.30 वा. ते 13.39 वा. चे दरम्यान पुरवठा शाखा, बार्शी तहसिल कार्यालय, येथील श्रीमती वर्षा भगवान काळे, वय 30 वर्षे, डाटा इंन्ट्री ऑपरेटर (खाजगी स्वरुपात) यांनी माझ्या पिवळ्या रेशनकार्डावर धान्य सुरु करण्यासाठी पडताळणी कारवाई माझ्याकडे 1500/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकरण्याची तयार दर्शवून, सापळा कारवाईमध्ये ती लाच रक्कम स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी श्रीमती वर्षा भगवान काळे, वय 30 वर्षे, डाटा इंन्ट्री ऑपरेटर (खाजगी स्वरुपात) पुरवठा शाखा, बार्शी तहसिल कार्यालय यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून, तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेशकुंभार)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
ANNASAHEB RAMCHANDRA MANJARE(I (Inspector)) / PCMH25624 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकारी ...)
ठाणे अंमलदार
बार्शी शहर पोलीस ठाणे

Name (नाव): ANNASAHEB RAMCH
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PCMH25624